# विदर्भातील लिंगगुणोत्तराचा अभ्यास

**पी. डी. जाधव**
गो. सी. गावंडे महाविद्यालय, उमरखेड
jadhao.p@gsgcollege.edu.in

## प्रास्ताविक

सन 1960 मध्ये महारष्ट्र राज्याची निर्मिमी झाली. या नवनिर्मित महाराष्ट्र राज्यात विदर्भाचा समावेश झाला. विदर्भाचे क्षेत्रफळ 97.23लाख हेक्टर इतके असून ते महाराष्ट्र राज्याच्या 31.61 प्रतिशत इतके आहे. विदर्भात एकुण 11 जिल्हे आहेत. नागपुर व अमरावती हे विदर्भाचे हे विदर्भाचे दोन प्रमुख शासकीय विभाग आहेत. विदर्भात एकुण 120 तालुके असून गावांची व खेडयांची संख्या 14853 इतकी आहे. सन 2011 मध्ये विदर्भाची लोकसंख्या 2.29 कोटी इतकी असून ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या 20.48 प्रतिशत इतकी आहे.

लोकसंख्या ही त्या विभागातील श्रमशक्ती असते. या श्रमशक्तीचा योग्य व व्यवस्थीत उपयोग करून घेतल्यास राज्याचा आर्थिक विकास होतो. आर्थिक विकास हा त्या भागात असलेली नैसर्गिक साधनसामुग्री व तेथील लोकसंख्येचे स्वरूप यावर अवलंबून असते. प्रदेशातील नैसर्गिक साधन सामुग्रीचा परीपुर्ण उपयोग करून घेणे हा बऱ्याच प्रमाणात लोकसंख्यांची रचना, लोकांची उपक्रमशिलता, लोकांची कार्यक्षमता, तंत्रज्ञान आणि शासनाचे धोरण यावर अवलंबून असते.

सन 1961 ते 2011 हया पाच दशकात विदर्भातील लिंग गुणोत्तर प्रमाणात बदल झाला आहे. निसर्ग नियमानुसार स्त्री पुरूषाचे प्रमाण 50 : 50 असायना हवे परंतु देशाची आर्थिक परीस्थिती आणि स्त्रीयांचे समाजातील स्थान हेघटक लिंग किंवा प्रमाणात विषमता आणतात. लिंग गुणोत्तर प्रमाण नेमके 1000 असणे ही आदर्श स्थिती असते परंतु तशी स्थिती नसेल तर लिंग गुणोत्तर प्रमाण विषम होते. तेंव्हा सामाजिक समस्या निर्माण होतात.

प्रसतुत शोध निबंधात विदर्भातील स्त्री पुरूष प्रमाण याचा अभ्यास करण्यात आला आहे.

तक्ता क्र. 1 विदर्भातील लोकसंख्येची रचना
( लोकसंख्या लाखत )

| वर्ष | एकुण लोकसंख्या | | | दरवार्षिक वृध्दीदर | घनता | लिंग गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | एकुण | | | |
| 1961 | 47.15 (51.07) | 45.18 (48.93) | 92.33 | 15.81 | 95 | 958 |
| 1971 | 59.85 (51.25) | 56.11 (48.75) | 116.77 | 24.44 | 120 | 950 |
| 1981 | 73.40 (51.19) | 69.98 (48.81) | 143.48 | 26.61 | 147 | 953 |
| 1991 | 89.35 (51.36) | 84.61 (48.64) | 173.96 | 30.58 | 178 | 946 |
| 2001 | 105.98 (51.38) | 100.29 (48.62) | 206.27 | 32.31 | 212 | 946 |
| 2011 | 117.87 (51.26) | 112.03 (48.74) | 229.96 | 23.69 | 236 | 950 |
| 1961 ते 2011 | 149.99 | 147.96 | 149.06 | 7.88 | 141 | 8 |

(टिप :– कंसातील आकडे एकुण लोकसंख्येतील पुरूष व स्त्रीयांचे प्रमाण दर्शवितात).
स्त्रोतः– 1) महाराष्ट्र राज्याचा सांख्यिकीय गोषवारा 1968 –69, 1972–73, 1985–86, 2001–02
2) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2011–12

सन 1961 ते 2011 या काळात विदर्भातील लोकसंख्येत 92.33 लाखावरून 229.96 लाखापर्यंत 137.63 लाखांनी भर पडली असुन ही भर शेकडा 149.06 नी पडली आहे. याच काळात पुरूष लोकसंख्येत 47.15 लाखावरून 117.87 लाखापर्यंत 70.72 लाखांनी भर पडली असुन ही भर शेकडा 149. 99 नी पडली आहे. तर स्त्री लोकसंख्येत 45.18 लाखावरून 112.03 लाखापर्यंत 66.85 लाखांनी भर पडली असुन ही भर शेकडा 147.96 नी पडली आहे.

सन 1961 मध्ये विदर्भातील एकुण लोकसंख्येत पुरूष लोकसंख्येचा वाटा 51.07 प्रतिशत इतका होता तर स्त्रीयांचा वाटा 48.93 प्रतिशत इतका होता. सन 2011 मध्ये विदर्भातील एकुण लोकसंख्येत पुरूष लोकसंख्येचा वाटा 51.26 प्रतिशत इतका होता तर स्त्रीयांचा वाटा 48.74 प्रतिशत इतका आहे.

एकंदरीत सन 1961 ते 2011 याकाळात विदर्भातील एकुण लोकसंख्येतील पुरूष लोकसंख्येचा वाटा 51.07 प्रतिशत वरून 51.26 प्रतिशत पर्यंत 0.29 प्रतिशत बिंदुने वाढला आहे. तर एकुण लोकसंख्येतील स्त्री लोकसंख्येचा वाटा 48.93 प्रतिशत वरून 48.74 प्रतिशत पर्यंत 0.29 प्रतिशत बिंदुने घटला आहे. कंदरीत सन 1961 ते 2011 याकाळात विदर्भातील एकुण लोकसंख्येतील पुरूष लोकसंख्येचा वाटा वाढला आहे तर स्त्री लोकसंख्येचा वाटा कमी झाला आहे. म्हणजेच लिंगगुणोत्तर विषमता आढळुन येते.

सन 1961 ते 2011 याकाळात विदर्भातील लिंगगुणोत्तर प्रमाणात 958 वरून 950 पर्यंत 8 नी घट झाली आहे. म्हणजेच प्रति 1000 पुरूषामागे स्त्रीयांची संख्या घटली आहे.

लिंगगुणोत्तर विषमता असण्याचे कारण सामाजिक , आर्थिक , राजकिय आणि प्राकृतिक कारणांमुळे जास्त लोकांचे शहरी भागात होणारे स्थानांतरण होणे, समाजाचा स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोण इ. याशिवाय लिंगगुणोत्तर प्रमाण कमी असण्याचे कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

1. ग्रामीण भागातील अंधश्रध्दा, रूढी व परंपरा
2. आरोग्य विषयक सोयींचा अभाव
3. बालविवाह पध्दतीमुळे जननक्षम वयोगटातील मुलींच्या मृत्युचे प्रमाण मोठे आहे.
4. समाजात स्त्रीयांना दिलेला दुययम दर्जा
5. स्त्रीयांचे साक्षरतेचे कमी प्रमाण
6. ग्रामीण भागात रोजगार निर्मितीचा अभाव

## लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी धोरणात्मक उपाय

1. हुंडा प्रतिबंधक कायद्याची योग्य अंमलबजावणी करावी.
2. स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी सरकार, डॉक्टर्स, नर्स, समाजसुधारक व स्वयंसेवी संघटनांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे.
3. प्रसुतीपुर्व गर्भलिंग निदान कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.
4. स्त्रियांच्या शिक्षणात वाढ करावी.
5. स्त्रियांसाठी स्वतंत्रपणे आरोग्य अभियान राबवावे.
6. बालविवाह कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.
7. स्त्री समाजजीवनाचा प्रमुख स्तंभ आहे या संदर्भात लोकांमध्ये जनजागृती करावी.
8. स्माजसुधारक व सेवाभावी संस्थानी पथनाटय व व्याख्यान, परीसंवाद यांच्यामाध्यमातून स्त्री सक्षमीकरणासाठी व व तीही वंशाची दिवा असू शकते याबदल लोकांमध्ये जनजागृती करावी.
9. कौटुबिक हिंसाचार कायद्यासंदर्भात जनजागृती करावी व अत्याचाराला बळी पडलेल्या मलिांचे पुनर्रवसन करावे.
10. समाजातील अंधश्रध्दा व रूढी परंपरा यांचा बिमोड करून स्त्रीच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी सामान्य लोकांपासून ते शासनापर्यंत प्रयत्न आवश्यक आहे.

## संदर्भ


1. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था – एस. एम. कोलते
2. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था – प्रा. आर. एस. सोळुंके
3. विदर्भाची अर्थव्यवस्था – प्रा. एन. बी. वैद्य
4. महाराष्ट्र राज्याचा सांख्यिकीय गोषवारा 1968–69, 1972–73, 1985–86, 2001–02
5. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2011–12